# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.04.2026** **वारः गुरुवार**

1. नारीशक्ती वंदन अधिनियमातील सुधारणांवर चर्चा करण्यासाठी आजपासून संसदेचं विशेष अधिवेशन
2. वैद्यकीय व्यवसाय हा मानवसेवेचा एक मार्ग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
3. नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी राष्ट्रीय महिला आयोगाकडून समिती स्थापन
4. अमरावतीमध्ये अल्पवयीन मुलींचा छळ केल्या प्रकरणी विशेष तपास पथक चौकशी करणार आणि
5. राज्याच्या विविध भागात उष्णतेचा लाटेचा इशारा; नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचं राज्य सरकारचं आवाहन

**नारीशक्ती वंदन**

नारीशक्ती वंदन अधिनियमातील महत्त्वाच्या घटनात्मक सुधारणेवर चर्चा करण्यासाठी आजपासून संसदेचं तीन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. या विधेयकावर लोकसभेत अठरा तास चर्चा अपेक्षित आहे, तर राज्यसभेत दहा तासांची चर्चा ठेवली असल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. महिला आरक्षण विधेयकातील सर्व तरतूदी काळजीपूर्वक आखण्यात आल्याचंही रिजिजू यांनी सांगितलं.

दरम्यान देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी या महिला आरक्षणाला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांनी याबाबतचं पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलं आहे.

**मुख्यमंत्री**

देशाच्या विकासात महिलांचा 50 टक्के सहभाग जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत भारत विकसित राष्ट्र होऊ शकत नाही, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत केलं. नारीशक्ती विचार मंच आयोजित 'नारी शक्ती वंदन महिला संमेलन' कार्यक्रमात ते काल बोलत होते. महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे, यांच्यासह महिला लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. नारीशक्ती वंदन विधेयकामुळे भविष्यात देशातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात महिलांचा सहभाग आणखी वाढेल, संसद आणि विधिमंडळात मोठ्या प्रमाणात महिला लोकप्रतिनिधी निवडून येतील. त्यामुळे महिलांच्या विकासाला आणि नेतृत्वाला नवी गती मिळेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. नारीशक्ती वंदन विधेयकाला सर्वांनी एकजुटीने पाठिंबा द्यावा, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**पदयात्रा-यवतमाळ**

यवतमाळमध्ये नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ महिलांच्या विविध संस्था संघटनांनी काल भव्य पदयात्रा काढली होती. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके आणि भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापुरे यांच्यासह मोठ्या संख्येनं महिला या पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या.

**राष्ट्रपती एम्स-नागपूर**

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्री दृष्टीकोनाची जागा घेऊ शकत नाही असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल नागपूर इथं एम्स संस्थेच्या पदवीप्रदान समारंभात बोलत होत्या. वैद्यकीय क्षेत्र हा केवळ व्यवसाय नाही तर संवेदनशीलतेनं मानवसेवा करण्याचा तो एक मार्ग आहे. डॉक्टर रोग बरा करण्याबरोबरच रुग्णाच्या मनात आशेची ज्योत जागवण्याचे काम करतात असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे उपस्थित होते.

**राष्ट्रपती आयआरएस**

भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांच्या 78 व्या तुकडीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची सांगता काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत झाली. नागपूरमधल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते 11 गुणवंत अधिकाऱ्यांना सुवर्ण पदक प्रदान करण्यात आलं. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यावेळी उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थी महसूल अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रपती म्हणाल्या.....

**भारतीय इतिहास के महान विचारों कोटिल्लो ने अर्थशास्त्र में शासन का एक कालजोय सिद्धांत प्रस्तुत किया था। उन्होंने कहा था की जिस प्रकार मधुमक्खी फूलों को चोटी पहुँचाये बिना उनसे मधु संचित करती है उसी प्रकार शासक को प्रजापुर और भर डाले बिना और संग्रह करना चाहिए। ये विचार आज भी उतना ही प्रासंगिक है। ये हमें सिखाता है की करदाता केवल राजस्व संग्रह का माध्यम नहीं बल्कि ये राज्यों और नागरिकों के बीच विश्वास का सेतु भी है।**

आज सकाळी राष्ट्रपती वर्धा इथल्या सेवाग्राम आश्रमाला भेट देणार असून त्यानंतर त्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात सहभागी होतील.

**बिहार**

भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी काल बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांनी पाटण्यातल्या लोकभवनात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. संयुक्त जनता दलाचे विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यांनी यावेळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बिहारमध्ये प्रथमच भाजपाच्या नेतृत्त्वाखाली सरकार स्थापन झालं आहे.

**नाशिक प्रकरण**

नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी तथ्यांची पडताळणी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगानं एका समितीची स्थापना केली आहे. ही समिती शनिवारी नाशिकमध्ये कंपनीच्या कार्यालयाला भेट देणार आहे. 10 दिवसात या समितीला अहवाल देण्याचे आदेश आयोगानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती साधना जाधव या समितीच्या अध्यक्ष असतील.

दरम्यान नाशिक पोलीसांनी या प्रकरणी दहशतवादविरोधी पथक आणि राष्ट्रीय तपास संस्थेशी पत्रव्यवहार केला आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी काल माध्यमांशी बोलताना दिली. धर्मांतर प्रकरणाची व्याप्ती परदेशापर्यंत पोहचलेली आहे का; परकीय कट्टरपंथीय संघटनांकडून संबंधित आरोपींच्या टोळीला निधी पुरवला जात होता का; असा पोलिसांना संशय आहे, त्याबाबतचे ठोस पुरावे शोधण्याच्या उद्देशानं हा पत्रव्यवहार केल्याचं कर्णिक यांनी सांगितलं.

**परतवाडा-अमरावती**

अमरावती जिल्ह्यात अचलपूर-परतवाडा परिसरात अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. 10 पोलिस अधिकारी आणि 36 कर्मचारी अचलपूरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्त्वाखाली या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह 4 जणांना अटक केली आहे. 180 अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ काढून, त्याची भीती दाखवून वेश्याव्यवसायात ढकललं असा त्यांच्यावर आरोप आहे.

**सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यात तांबळडेग परिसरातल्या समुद्रिक क्षेत्रात मच्छीमार आणि ग्रामस्थांनी समुद्र शेवाळ शेतीचा यशस्वी प्रयोग राबवून समुद्रातल्या शेतीचा एक आदर्श निर्माण केलाय. जाणून घेऊया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या मदतीने आणि केंद्रीय मीठ आणि सागरी रसायन संशोधन संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला असून, यामुळे कोकण किनारपट्टीवर रोजगाराची एक नवी संधी निर्माण झाली आहे. तांबळडेगच्या समुद्रात आठ ते दहा वाव अंतरात सुमारे दीड हेक्टर क्षेत्रावर ही शेती करण्यात आली आहे. या शेतीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण आणि आर्थिक मदत सरकारी योजनेतून मिळाल्यान हा प्रयोग यशस्वी झाला आहे. समुद्र शेवाळाचा उपयोग

प्रामुख्यान सेंद्रिय खत, औषध आणि खाद्यपदार्थांमध्ये केला जातो. या शेवाळापासून बनवलेल्या खतामुळे शेती पिकांची गुणवत्ता सुधारते आणि हवामानातील बदलांना तोंड देण्याची ताकद पिकांमध्ये निर्माण होते. या उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी 'क्लायमा क्यू' या कंपनीसोबत करार करण्यात आला असून, ही कंपनी हमीभावान शेवाळाची खरेदी करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेची काळजी करण्याची गरज उरलेली नाही.  या उपक्रमामुळे  बदलत्या काळात मासेमारीवर अवलंबून राहण्यासोबतच समुद्र शेवाळ शेती हा एक शाश्वत आणि फायदेशीर पर्याय म्हणून समोर येत आहे.

**<u>नदी स्वच्छता-नाशिक</u>**

राज्य शासनाच्या 'चला जाणुया नदीला' या अभियानांतर्गत नाशिक जिल्ह्यातल्या नंदिनी नदीच्या संवर्धनासाठी नदी पात्रातील गाळ आणि माती

काढण्याच्या कामाचा नुकताच प्रारंभ करण्यात आला. या कामामुळे नदीचं पुनरुज्जीवन होण्यास मदत होणार असून, पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढल्यानं नदी बारमाही होण्यास चालना मिळेल.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या विविध भागात कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. अकोला इथं काल पारा 44 अंशांवर गेला; तर नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथही 43 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हिंगोलीमध्येही पारा 42 अंशांवर पोहोचला असून काल एका तरुणाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचं निदान झालं आहे.

येत्या दोन-तीन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकणात काही ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान खात्यानं दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे. दुपारी 12 ते 4 या वेळेत उन्हात जाणं टाळावं, अत्यावश्यक कामांसाठी बाहेर जाताना उन्हाच्या झळा लागणार नाहीत, याची काळजी घ्यावी, भरपूर पाणी प्यावं, विशेषतः जेष्ठ नागरिक आणि मुलांची काळजी घ्यावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.